# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. 46/2022    दिनांक : 02.02.2022

# 1)जबरी चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 01.02.2022 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **सुनिलनगर बळीरामपुर ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा सुनिलनगर बळीरामपुर येथुन त्याचे आईचा जेवणाचा डब्बा घेवुन ॲटो क्र. एमएच–26/जी–6196 ने जात असताना एमआयडीसी रोड सुनिलनगर बळीरामपुर पाटी जवळ आले असता फिर्यादीने खडयामुळे ॲटो हळुवारपणे घेत असतांना यातील आरोपी यांनी ॲटो थांबवुन ॲटोत फिर्यादीचे दोन्ही बाजुने बसुन फिर्यादीस बुक्याने मारहाण करुन फिर्यादीचे पॅन्टचे वॉच पाकीटातील दोन हजार रुपये जबरीने काढुन चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी सुधाकर कोंडीबा चिंतोरे, वय 42 वर्षे व्यवसाय ॲटोचालक रा. टाकळगाव ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रा** गुरनं 58/2022 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री संकेत दिघे, मो.क्र. 9834255985** हे करीत आहेत.

# 2)घरफोडी :–

**1)हिमायतनगर :–**दिनांक 31.01.2022 रोजी चे 19.30 ते दिनांक 01.02.2022 रोजी चे 09.45 वा. चे दरम्यान, **रहीम कॉलनी,हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा घरी नसताना त्यांचे घराच्या दरवाज्याचे कुलूप तोडुन आत घरात प्रवेश करुन टी.व्ही. व नगदी चार हजार रुपये, चांदीचे दागिने, असा एकुण किमंती 28,000/–रुपयाचा माल अज्ञात आरोपीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी राजेश उत्तम जाधव, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती व व्यापार रा. रहिम कॉलनी हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 21/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री चौधरी, मो.क्र. 9764123018** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–**दिनांक 29.12.2021 रोजी ते दिनांक 31.01.2022 चे दरम्यान, **नवीन श्रावस्तीनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी त्यांचे कुटूंबासह मुंबई येथे कामासाठी गेले असता घराचे कडीकोंडा तोडून सोन्या चांदीचे दागीने, घरगुती सामान असा एकुण 2,10,000/–रुपयाचा माल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी शिलाबाई प्रकाश हणमंते, वय 49 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. श्रावस्तीनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 38/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.क्र. 9373774648** हे करीत आहेत.

# 3)चोरी :–

**मुखेड :–**दिनांक 31.01.2022 रोजी चे रात्री 11.45 वा. ते दिनांक 01.02.2022 रोजीचे सकाळी 06.00 वा. दरम्यान, **न्यु महाराष्ट्र हॉटेल जांब बु. समोर ता.मुखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे उभ्या असलेले ट्रक मधून 50 किलोग्रॅम वजनाचे 29 पोते 14.5 क्विंटल एडीएम आग्रो कंपनीचे सोयाबीन किंमती 70,000/– रुपयाचा कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी राजु लालबा ओटबे, वय 42 वर्षे, व्यवसाय चालक रा. अल्लापुर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 26/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1265 गीते मो. क्र. 9764174307** हे करीत आहेत.

# 4)मो. सा. चोरी :–

**विमानतळ :–**दिनांक 31.01.2022 रोजी सायंकाळी 19.00 वा. ते दिनांक 01.02.2022 रोजी चे सकाळी 07.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरा समोर ब्राम्हसिंगनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची हिरो कंपनीची पॅशन प्रो काळा रंगाची मो. सा. क्र. एमएच–26/बीआर–6782 किंमती 30,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शुभम सुरेश पवार, वय 23 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. वारकवाडी ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 41/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1724 पांचाळ, मो.क्र. 9423437844** हे करीत आहेत.

## 5)गंभीर दुखापत :–

**1)विमानतळ :–**दिनांक 24.01.2022 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **लक्ष्मीनगर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीस लहान मुलाने पुदीन्याचे पान तोडल्याच्या कारणावरुन नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन हातातील लाकडाने डावे हाताचे दंडावर,पाठीवर, डाव्या पायावर व मनगटावर मारुन गंभीर दुखापत केली तसेच लाथाबुक्याने मारहाण केली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी तबसुम बेगम मोहम्मद शेख आजम, वय 30 वर्षे, व्यवसाय घरकाम व मजुरी रा. लक्ष्मीनगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 40/2022 कलम 326,324,323,504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री गौड, मो. नं. 7972560742** हे करीत आहेत.

**2)देगलूर :–**दिनांक 01.02.2022 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **कुरेशी मार्केट,देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस समाजाचे बैठकीत जनावरांचे व्यापार विषयी मार्गदर्शन करीत असताना तु लई शहाना गेलास का असे म्हणुन नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन हातातील चाकुने तळहातावर मारुन गंभीर दुखापत केली तसेच थापडबुक्याने मारहाण केली व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मगदुम कुरेशी मौलाना कुरेशी, वय 48 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. देगलूर ता. देगलूर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरन 53/2022 कलम 326,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोनि/श्री गड्डिमे, मो. नं. 9821159844** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :–

**बिलोली :–** लग्न झाले एक वर्षा पासुन ते दिनांक 31.01.2022 रोजीचे 14.00 वा. पर्यंत, **फिर्यादीचे सासरी व माहेरी मौजे मिनकी ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस माहेरहुन एक लाख रुपये घेवून ये म्हणुन तीला मारहाण करुन, तिचा शारिरीक व मानसीक छळ केला. शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 27 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 17/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1985 शिंदे**, **मो.क्र. 7721005064** हे करीत आहेत.

## 7)अपघात :–

**कंधार :–** दिनांक 31.01.2022 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **बिजेवाडी गावाजवळ रोडवर वळणावर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील आरोपीने त्यांचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच/26–बीएन–1453 ही हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन **मयत नामे रामकिशन दगडोबा केंद्रे वय 40 वर्षे व्यवसाय शेती रा. माळहिपरगा ता. जळकोट जि. लातुर** यांना पाडल्याने डोक्याला गंभीर मार लागुन मरण पावला. वगैरे **फिर्यादी मंगल रामकिशन केंद्रे वय 30 वर्षे व्यवसाय शेती रा. माळहिपरगा ता. जळकोट जि. लातुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं. 29/2022 कलम 279,304(अ) भादवी सह कलम 184 मोटार वाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/लोणीकर, मो.क्र. 9422336474** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**कंधार :–** दिनांक 31.01.2022 रोजी चे 20.30 वा. चे सुमारास, **रुई ते कल्लाळी जाणारे रोडवर मौजे कल्लाळी, ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले ताब्यातील मो.सा. एम.एच./26–बीएस–0764 वर देशी दारु भिंगरी संत्रा किंमती 11,640/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गोपाल चंद्रपाल इंद्राळे, ने. पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 30/2022 कलम 65,83 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1959 व्यवहारे, मो.क्र. 9604333256** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस अधिक्षक कार्यालय,नांदेड**